# राजकीय विचारसरणी

## अर्थ आणि महत्त्व

समीक्षा फराकटे

# अर्थ

- आपण जगाचे निरीक्षण करत असताना त्याचा अर्थ लावत असतो. हा अर्थ काही गृहीतकांवर आधारलेला असतो. ही गृहीतके विचाररंपरांतून येत असतात. **आपल्या राजकीय जगाचा अर्थ लावणारया अशा विचारपरंपरांना विचारसरणी म्हणतात.**
- राजकीय विचारसरणी –
- आपल्या सामाजिक-आर्थिक-राजकीय जगाच्या रचनेचा अर्थ आपल्याला सांगते, तिच्या स्वरूपाचे विश्लेषण करते.
- जग आणि त्यातील मानवी संबंध कसे असतील याचे एक चित्र उभे करते, विवेचन करते.
- हे आदर्श जग साकार करण्यासाठी काय करावे लागेल आणि कसे करावे लागेल याचे मार्गदर्शन करते.

# विचारसरणीविषयीचे दृष्टीकोन

- डेस्ट्युट डे ट्रेसी या फ्रेंच तत्त्वज्ञाने १७९६ मध्ये प्रथम ‘विचारिसारणी या शब्दाचा उपयोग ‘कल्पनांचे शास्त्र’ (science of ideas : idea+ology) या अर्थाने केला.
- कार्ल मार्क्स यांनी ‘विचारसरणी’कडे ‘वर्चस्वशाली वर्गाच्या कल्पना’ म्हणून बघितले. नाही रे वर्गात ‘भ्रम’ निर्माण करण्याचे काम विचारिसरणी करते.
- कार्ल पॉपर, जे.एल. टालमन, हॅना अरे यांनी दोन युद्धादरम्यान उदय पावलेल्या फासिवादाच्या संदर्भात विचारसरणीचा अर्थ लावला. लोकांवर सता प्रस्थापित करून, त्यांची शासनप्रकाराला संमती मिळवून सामाजिक नियंत्रण प्रस्थापित करण्याचे साधन म्हणून विचारिसरणी काम करते. ‘विचारांची बंदिस्त व्यवस्था’ म्हणंजे विचारसरणी.
- मिशेल ओकशॉट यांनी विचारसरणी म्हणजे ‘विचारांची अमूर्त व्यवस्था’ असे म्हटले, ज्यातून राजकीय सत्याचे विद्रूपीकरण होते. सत्याचे स्वरूप मांडण्याचा दावा विचारसरणी करते.

# सर्वसमावेषक व्याख्या

- विचारसरणी हा शब्द सकारात्मक व नकारार्थी अशा दोन्ही दृष्टींनी पाहिला जातो. त्यामुळे सर्वसमावेशक व्याख्या करणे अवघड बनते, **अशी व्याख्या तटस्थ असणे आवश्यक आहे.**
- ‘चांगली’ किंवा ‘वाईट’, ‘मुक्तीदायी किंवा शोषक’ याच्या पलीकडे विचारसरणी ही एक राजकीय संकल्पना आहे.
- विचारसरणी **म्हणजे एक कृतीशील विचारव्यवस्था, राजकीय कृतीचे दिशादर्शन करणारी परस्पर निगडित विचारांची रचना.**

# महत्त्व

- आपल्या सामाजिक-आर्थिक-राजकीय भोवतालाला आकार देण्यात विचारसरणी महत्त्वाची भूमिका बजावत असतात. म्हणून विचारसरणीने आधुनिक इतिहासाच्या घडणीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे.
- संविधानातील व व्यवहारातील राजकीय मूल्ये तसेच देशाचे आर्थिक धोरण हे या ना त्या विचारसरणीचे प्रतिबिंब असते.
- विचारसणीअभावी राजकारणाला दिशाहीनता येते व वर्चस्वशाली गटांचा अनिष्ट फायदा होतो.
- विचारसरणी आपल्या सामाजिक प्रश्नांचे विश्लेषण करून चांगल्या समाजाची दिशा दाखविते.
- आदर्शांचे राजकारण उघड सत्ताकारणाला छेद देते.

# विचारसरणीचा अंत?

- दुसऱ्या महायुद्धानंतर 'औद्योगिकरणातून विकास' ही सर्वमान्य वाट बनली. विचारसरणीपेक्षा आर्थिक विकासाच्या गरजा आणि टप्पा हे देशाच्या धोरणाचे निर्णायक घटक बनले. काही विचारवंतांनी हा **विचारसरणीचा अंत** आहे असे सूचविले. औद्योगिक क्रांतीबरोबर निर्माण झालेले प्रश्न व विरोधाभास संपुष्टात आले आहेत – भांडवली विकास (खाजगी किंवा राज्याकरवी), संपत्तीच्या पुनर्वाटपासाठी कल्याणकारी राज्य, राजकीय क्षेत्रात नागरी अधिकार आणि लोकशाही ही सर्वमान्य मूल्ये बनल्याचे अधोरेखित केले गेले.
- व्यक्तीवादातून येणारा सापेक्षतावाद हा सुद्धा, सर्वमान्य हितकारक एकमेव व्यवस्थेची अधिमान्यता अमान्य करतो. हे उत्तर-आधुनिकतेचे लक्षण बनले.
- **एस. एम. लिप्सेट, डॅनिअल बेल, एडवर्ड शिल्स** हे 'विचारसरणीचा अंत' भूमिकेचे प्रमुख पुरस्कर्ते होते.
- विचारसरणीचा अंत या विचाराचा प्रतिवाद करणारयानी हा वाद म्हणजे पाश्चात्त्य विचारसरणीच्या मक्तेदारीचा नवा चेहरा आहे असे सांगितले. नवीन पर्यायी विचारप्रवाह, कल्पना समोर येणे, त्यांचा सार्वजनिक चर्चाविश्वात विचार होणे हे मानवी अस्तित्त्वासाठी व विकासासाठी नेहमीच आवश्यक आहे. विचारसरणींचे आयाम बदलले आहेत. वैचारिक भूमिकांविरहीत व्यवहार राजकारणाचा दर्जा शून्य करतो.

# धन्यवाद